रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, ऑगस्ट १, २००६/श्रावण १०, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Private Professional Educational Institutions [Reservation of seats for admission for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes and Other Backward Classes] Act, 2006 (Mah. XXX of 2006), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXX OF 2006.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 1st August 2006).*

An Act to make special provisions for reservation of seats for admission for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes and Other Backward Classes in Private Professional Educational Institutions ; and for matters connected therewith or incidental thereto.

WHEREAS the Supreme Court, in the case of P. A. Inamdar and Others *versus* State of Maharashtra (reported in (2005) 6 SCC 537), has held that neither can the policy of reservation be enforced by the State nor can any quota or percentage of admission be carved out to be appropriated by the State in Private Professional Educational Institutions ;

AND WHEREAS in order to protect the interests of any socially and educationally backward classes of citizens or the Scheduled Castes or the Scheduled Tribes, article 15 of the Constitution of India has



[किंमत : रुपये ९.००]

been amended by the Constitution (Ninety-third Amendment) Act, 2005, by adding clause (*5*) thereto, which empowers the State to make, by law, a special provision for the advancement of those classes, castes and tribes, in so far as such special provisions relate to their admission to educational institutions, including private educational institutions, whether aided by the State or not, other than the minority educational institutions referred to in clause (*1*) of article 30 of the Constitution ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action to make, by law, special provisions for reservation of seats for admission for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes and Other Backward Classes in Private Professional Educational Institutions ; and for matters connected therewith or incidental thereto ; and, therefore, promulgated the Maharashtra Private Professional Educational Institutions (Reservation of seats for admission for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes and Other Backward Classes) Ordinance, 2006, on the 16th June 2006 ; Mah. Ord. V of 2006.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Fifty-seventh Year of the Republic of India as follows :—

Short title, extent and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Private Professional Educational Institutions (Reservation of seats for admission for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes and Other Backward Classes) Act, 2006.

(*2*) It shall extend to the whole of the State of Maharashtra.

(*3*) It shall be deemed to have come into force on the 16th June 2006.

Definitions.

**2.** In this Act, unless the context otherwise requires,—

(*a*) "Aided Private Professional Educational Institution" means a Private Professional Educational Institution, excluding a Minority Educational Institution referred to in clause (*1*) of article 30 of the Constitution, receiving recurring financial aid or assistance in whole or in part from the Government, or from any body under the control of the Government ;

(*b*) "Appropriate Authority" means, the Medical Council of India, the Dental Council of India, the Central Council of Indian Medicine, the All India Council of Technical Education, and includes any other authority established by law that governs or controls the conduct of a particular professional course or educational discipline ;

(*c*) " Creamy Layer " means the category of ' Creamy Layer ' as declared by the Social Justice, Cultural Affairs and Special Assistance Department of the Government, on the basis of income, by general or special orders, issued from time to time ;

(*d*) " De-notified Tribes (*Vimukta Jatis*)" means the Tribes declared as such by the Government, from time to time ;

(*e*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*f*) " Minority Educational Institution " means a Private Professional Educational Institution administered, managed and controlled by a minority, and shall include any such educational institution declared by the Government to be an institution entitled to enjoy the protection granted under clause (*1*) of article 30 of the Constitution ;

(*g*) " Nomadic Tribes " means the Tribes wandering from place to place in search of their livelihood, as declared by the Government, from time to time ;

(*h*) " Other Backward Classes " means any socially and educationally backward classes of citizens as declared by the Government and includes Other Backward Classes declared by the Government of India in relation to the State of Maharashtra ;

(*i*) " Private Professional Educational Institution " means any College, School, Institute, Institution or other body, by whatever name called, conducting any professional course or courses approved or recognized by the Appropriate Authority and affiliated to any University, but shall not include any such institution established, maintained or administered by the Central Government, any State Government, any local authority or institution declared to be Deemed University under section 3 of the University Grants Commission Act, 1956 ; 3 of 1956.

(*j*) " Professional Course " means any educational course of study notified as such, from time to time, by the Government in the *Official Gazette ;*

(*k*) " prescribed " means prescribed by the rules framed by the Government under this Act ;

(*l*) " Reserved Category " means the category of candidates belonging to—

(*i*) the Scheduled Castes and the Scheduled Tribes ;

(*ii*) the De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, and Other Backward Classes and who are not falling in Creamy Layer ;

(m) "Sanctioned Intake" means the total number of seats sanctioned or approved by the Appropriate Authority for admitting candidates in a single academic year in each Professional Course of study or discipline in a Private Professional Educational Institution ;

(n) "Scheduled Castes" and "Scheduled Tribes" shall have the meanings respectively assigned to them in clauses (24) and (25) of article 366 of the Constitution ;

(o) "Unaided Private Professional Educational Institution" means a Private Professional Educational Institution, not being an Aided Private Professional Educational Institution ;

(p) "University" means the Maharashtra University of Health Sciences constituted under the Maharashtra University of Health Sciences Act, 1998, or any other University constituted or deemed to have been constituted under the Maharashtra Universities Act, 1994, but does not include any institution declared to be Deemed University under section 3 of the University Grants Commission Act, 1956. Mah. X of 1999. Mah. XXXV of 1994. 3 of 1956.

Applicability. 3. This Act shall apply to all Private Professional Educational Institutions in the State, excluding the Minority Educational Institutions.

Reservation in Aided Private Professional Educational Institutions. 4. (1) In every Aided Private Professional Educational Institution, seats equal to fifty per cent. of the Sanctioned Intake of each Professional Course shall be reserved for candidates belonging to the Reserved Category.

(2) The seats reserved for candidates belonging to the Reserved Category under sub-section (1) shall be filled in by admitting candidates belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes and Other Backward Classes, respectively, in the proportion specified in the Table below :—

TABLE

| Description of Caste/Tribe/Category/ Class of Reserved Category | Percentage of reservation |
|---|---|
| (1) Scheduled Castes and Scheduled Castes converts to Buddhism | 13 % |
| (2) Scheduled Tribes | 7 % |
| (3) De-notified Tribes (A) | 3 % |
| (4) Nomadic Tribes (B) | 2.5 % |
| (5) Nomadic Tribes (C) | 3.5 % |
| (6) Nomadic Tribes (D) | 2 % |
| (7) Other Backward Classes | 19 % |
| Total . . | 50 % |

*Note.*—The candidates belonging to the Special Backward Category shall be considered from and out of their respective original/parent Reserved Category such as Other Backward Classes :

Provided that, if candidates belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (A), Nomadic Tribes (B), Nomadic Tribes (C), Nomadic Tribes (D) or Other Backward Classes are not available to fill in the seats reserved for the said Castes, Tribes or Classes, in the same academic year, the seats shall be filled in, in such manner as may be specified, by Government by issuing an Order in the *Official Gazette*, from time to time.

*Explanation.*—For the purposes of this section,—

(*i*) " De-notified Tribes (A) ", " Nomadic Tribes (B) ", " Nomadic Tribes (C) " and " Nomadic Tribes (D) " shall mean such Tribes or sub-Tribes, declared by Government, by general or special orders issued in this behalf, from time to time, to be " the De-notified Tribes (A) ", " Nomadic Tribes (B) ", " Nomadic Tribes (C) " and " Nomadic Tribes (D) ";

(*ii*) " Special Backward Category " means socially and educationally backward classes of citizens declared as " Special Backward Category " by the Government.

Reservation in Unaided Private Professional Educational Institutions.

**5.** (*1*) In every Unaided Private Professional Educational Institutions, the seats to be reserved for candidates belonging to the Reserved Category shall be such as may be notified by the Government from time to time in the *Official Gazette*, but shall not exceed fifty per cent. of the Sanctioned Intake of any particular Professional Course.

(*2*) Out of the seats reserved under sub-section (*1*) for the candidates belonging to the Reserved Category, the seats to be filled in by admitting candidates belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes and Other Backward Classes, respectively, shall be in the same *inter se* proportion, and in the manner, specified in sub-section (*2*) of section 4.

Irregular admissions void.

**6.** Any admission made in contravention of the provisions of this Act shall be void.

Penalty.

**7.** Whoever contravenes the provisions of this Act or the rules made thereunder shall, on conviction, be punished with an imprisonment which may extend to three years and with a fine which shall not be less than twenty lakh rupees but which may extend to one crore rupees.

Protection of action taken in good faith.

**8.** No suit, prosecution or other legal proceedings shall lie against any authority or person for anything done or purported to have been done in good faith in pursuance of the provisions of this Act or the rules made thereunder.

Power to make rules.

**9.** *(1)* The Government may, by notification in the *Official Gazette,* make rules to carry out the purposes of this Act.

*(2)* Every rule made under this Act shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature, while it is in session for a total period of thirty days, which may be comprised in one session or in two or more successive sessions, and if, before the expiry of the session in which it is so laid or the sessions immediately following, both Houses agree in making any modification in the rule or both Houses agree that the rule should not be made, and notify their decision to that effect in the *Official Gazette,* the rule shall, from the date of publication of such decision in the *Official Gazette*, have effect only in such modified form or be of no effect, as the case may be; so, however, that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done or omitted to be done under that rule.

Provisions of the Act to be in addition to any other law.

**10.** The provisions of this Act shall be in addition to and not in derogation of the provisions contained in any other law for the time being in force.

Provisions not to prohibit Minority Educational Institutions from making reservations.

**11.** Notwithstanding anything contained in any other provisions of this Act, any Minority Educational Institution, whether aided or not, may provide for reservation in admissions to Professional Courses for candidates belonging to the Reserved Category.

Power to remove difficulty.

**12.** *(1)* If any difficulty arises in giving effect to the provisions of this Act, the Government may, as occasion arises, by an order published in the *Official Gazette,* do anything not inconsistent with the provisions of this Act, which appears to it to be necessary or expedient for removing the difficulty :

Provided that, no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of this Act.

*(2)* Every order made under this section shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

Mah. Ord. V of 2006. **13.** (*1*) The Maharashtra Private Professional Educational Institutions (Reservation of seats for admission for Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes and Other Backward Classes) Ordinance, 2006, is hereby repealed. Repeal of Mah. Ord. V of 2006 and saving.

(2) Notwithstanding such repeal anything done or any action taken (including any notification or order issued), under the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of this Act.

# पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११ ००७

संकेतस्थळ www.unipune.ernet.in


आरक्षण कक्ष
संदर्भ क्र. आरक्षण/ओ २२/७०८
दिनांक – २७/६/२०११

प्रति,
मा.विभाग प्रमुख
सर्व शैक्षणिक विभाग. पुणे विद्यापीठ,पुणे

मा. प्राचार्य/मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय – पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शैक्षणिक प्रवेशामध्ये ठेवावयाच्या आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी शासन आदेश निर्गमीत केलेले आहेत. प्राप्त शासन आदेश सर्व शैक्षणिक विभाग/सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्थांना यापूर्वीच वेळोवेळी पाठविण्यात आलेले असून सोबत शासन निर्णयाच्या प्रती जोडत आहे.

तरी शासनाने [illegible] वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबत – वरीलप्रमाणे

सही २७/०६/२०११.
सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

S. C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

भारतीय संविधानानुसार व मंडल आयोगाने
केलेल्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना
अनुदानित विद्यालये व संलग्नित शासकीय/अशासकीय
कला, वाणिज्य/विज्ञान/शिक्षणशास्त्र या शैक्षणिक
संस्थांमधील प्रवेशासाठी आरक्षण

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : युएसजी–१४९३/(२४२८)/विशि–४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२,
दिनांक २३ जून, १९९४

वाचा : १. शासन निर्णय, शिक्षण विभाग क्र. एमआयएस–१०७४/१३०३–एम, दिनांक २७ जून, १९७४.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी–१०९३/२१६७/सीआर–१४१/९३/१६–ब, दिनांक २३ मार्च, १९९४.

३. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी–१४९३ (२४२८)/विशि–४, दि. १० मे, १९९४.

४. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी–१४९३/(२४२८)/विशि–४, दि. १६ मे, १९९४.

शासन निर्णय : शासन निर्णय, शिक्षण विभाग क्र. एमआयएस–१०७४/१३०३–एम, दिनांक २७ जून, १९७४ अन्वये, शासकीय/अशासकीय शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेशासाठी खालीलप्रमाणे आरक्षण विहित करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| १. अनुसूचित जाती आणि नवबौद्ध | १३% |
| २. अनुसूचित जमाती (विनिर्दिष्ट भागाव्यतिरिक्त इतर भागातील धरून) | ७% |
| ३. विमुक्त आणि भटक्या जमाती | ४% |
| ४. इतर मागासवर्गीय | १०% |
| एकूण | ३४% |

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी–१०९३/२१६७/सीआर–१४१/९३/१६–ब, दिनांक २३–३–९४ अन्वये मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीकरिता खालीलप्रमाणे सुधारित आरक्षण विहित करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| (अ) विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती) | ३% |
| (ब) भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५% |
| (क) भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | ३.५% |
| (ड) भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | २% |
| (इ) इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९% |
| [illegible] | [illegible] |

३. शैक्षणिकसंस्थांमध्ये प्रवेश देण्यासाठी अपंग, संरक्षण सेवा, अनिवासी भारतीय, भारत सरकारचे नामनिर्देशित उमेदवार वगैरे विविध गटांकरितासुद्धा आरक्षण असते. तेव्हा या सर्व बाबींचा विचार करून मागासवर्गीयांच्या घटनेत मान्य गटांकरिता १९९४–९५ या शैक्षणिक वर्षापासून शासकीय/अशासकीय, अनुदानित व विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र इत्यादि संस्थांमध्ये खालीलप्रमाणे राखीव जागांचे प्रमाण विहित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

| | |
|---|---|
| १. अनुसूचित जाती व अनुसूचित जातींमधील बौद्धधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३% |
| २. अनुसूचित जमाती | ७% |
| ३. विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३% |
| ४. भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५% |
| ५. भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | ३.५% |
| ६. भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | २% |
| ७. इतर मागासवर्गीयांकरिता (ओ.बी.सी.) | १९% |
| एकूण | ५०% |

S. S. C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

[illegible] प्रवेश [illegible] अभ्यासक्रमनिहाय [illegible] आणि न [illegible] [illegible] त्याच्या अधिकारात असेल.

[illegible] प्रथम भरण्यात यावेत. मात्र आरक्षित जागेवर प्रवेश मिळाला [illegible] अभ्यासक्रम किंवा संस्था यासाठीच्या काही किंवा सर्व फक्त [illegible] [illegible] प्रवेश देण्यासाठी त्याच्या विनंतीनुसार पुनर्विचार करण्यात यावा.

६. शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश देताना एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास ते आरक्षण अनुशेष म्हणून पुढे ओढण्यात येत नसल्यामुळे व ते त्याच वर्षी भरावयाचे असल्यामुळे मागासवर्गीयांच्या इतर प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेश देऊन आरक्षण पूर्ण करण्यात यावे. यासाठी दिनांक २७ जून, १९७४ च्या परिपत्रक [illegible] आदेशांक तक्त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र अदलाबदलीने इतर प्रवर्गातून भरण्याचा प्रस्ताव करताना अशा रीतीने उपलब्ध मागासवर्गीयांची संख्या मूळ आरक्षण अधिक अदलाबदलीने दाखल विद्यार्थी यांची संख्या धरून ५०% पेक्षा अधिक असणार नाही.

७. मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार "क्रीमीलेयर" चे तत्त्व केंद्र शासनाने मान्य केले आहे. यासंदर्भात सविस्तर आदेश समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागाकडून निर्गमित करण्यात आलेले आहेत. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मा. ना. कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

भटक्या जमाती "क"

धनगर व त्याच्या तत्सम जातींची यादी

धनगर :—(१) अहिर. (२) डांगे. (३) गडारी. (४) हंडे. (५) वेलवर, (६) हटकर (७) हाटकर, (८) शेगर, (९) खुटेकर, (१०) तेलंगी, (११) तेल्लारी, (१२) कोकणी-धनगर, (१३) फानडे, (१४) वऱ्हाडे-धनगर, (१५) झाडे, (१६) शेटे, (१७) कुरमार, (१८) माहुरे, (१९) ल्हाडे, (२०) सनगर, (२१) धनगर.

(सीबीसी–१०८९/(२०३)/मावक–५, दि. २५ मे, १९९० अन्वये)

भटक्या जमाती "ड"

वंजारी व तत्सम जातींची यादी

वंजार, वंजारा, वंजारी.

S. S. C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन
विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक
संस्थामधून "विशेष मागास प्रवर्गाकरिता"
राखीव जागा ठेवणेबाबत

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : यूएसजी-१४०३/(२४२८)-विशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक २२ जून, १९९५

वाचा : (१) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. यूएसजी-१४९३/२४२८/ विशि-४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक-जुलै १९९४.

(२) शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी-१४९४/ प्र. क्र. २३६/मावक-५ दिनांक १३ जून. ९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक १५ जून, १९९५.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५

१. शासन निर्णय : राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती म्हणून विवक्षितपणे घोषित करण्यात आलेले जनसमुदाय वगळता अन्य काही जातीजमातींकडून सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या कारणावरुन विशेष सवलत देण्याची मागणी लक्षात घेता, शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी-१४९४/प्र. क्र. २३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक १५ जून, १९९५ मध्ये विशिष्ट जातींचा "विशेष मागास प्रवर्ग" यामध्ये समावेश करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. ज्या जातींचा "विशेष मागास प्रवर्गा" मध्ये समावेश करण्यात आला आहे त्याची यादी परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आली आहे.

२ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६-ब दिनांक १५ जून, १९९५ अन्वये "विशेष मागास प्रवर्गा" साठी २% आरक्षण शासकीय/निमशासकीय सेवेत ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

३. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी-१४९३/(२४२८) विशि-४, दिनांक २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्र दिनांक-जुलै, ९४ अन्वये इतर मागास वर्गासाठी अकृषि विद्यापीठे व संलग्नित शासकीय/अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व इतर शैक्षणिक संस्था यामधून प्रवेशासाठी आरक्षण ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशानुसार शैक्षणिक संस्थांमध्ये राखीव जागा ५०% या प्रमाणात ठेवण्यात आलेल्या आहेत. आता काही विशिष्ट जाती जमातींचा "विशेष मागास प्रवर्गा" त समावेश करण्यात आलेला असल्यामुळे या प्रवर्गाकरिता २% जागा उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमधून या आदेशान्वये राखून ठेवण्यात येत आहे. "विशेष मागास प्रवर्गा" करिता राखून ठेवण्यात आलेल्या २% जागा वाढल्याने आता शैक्षणिक संस्थामधून राखीव जागांचे प्रमाण खालीलप्रमाणे राहील :

| | | |
|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती व अनुसूचित जाती मधील बौद्धधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३% |
| (२) | अनुसूचित जमाती | ७% |
| (३) | [illegible] | ३% |
| (४) | भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५% |
| (५) | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ३.५% |
| (६) | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २% |
| (७) | इतर मागास वर्गीयांकरिता (ओ. बी. सी.) | १९% |
| (८) | विशेष मागास प्रवर्ग | २% |
| | एकूण | ५२% |

हे आदेश १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत आहेत.

४. सदर आरक्षण प्रत्येक संस्थांमध्ये अभ्यासक्रम निहाय असेल आणि ते मुक्त आणि मूल्याधारित भागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असेल.

आरक्षित जागा या प्रथमत: भरण्यात याव्यात. मात्र आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला तरी गुणवत्तेनुसार त्या उमेदवारांच्या अभ्यासक्रम किंवा संस्था याबाबतच्या काही किंवा सर्व फक्त वरच्या पसंतीकरीता अराखीव जागांमधून प्रवेश देण्यासाठी त्यांच्या विनंतीनुसार पुनर्विचार करण्यात यावा.

५. शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश देताना एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास ते आरक्षण अनुशेष म्हणून पुढे ओढण्यात येत नसल्यामुळे व ते त्याच वर्षी भरावयाचे असल्यामुळे मागासवर्गीयांच्या इतर गटातील उमेदवाराना प्रवेश देवून आरक्षण पूर्ण करण्यात यावे. यासाठी दिनांक २७ जून, १९७४ च्या परिच्छेद २ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र अदलाबदलीने इतर प्रवर्गातून भरण्याची तरतूद करताना अशा तऱ्हेने उपलब्ध मागासवर्गीयांची संख्या मूळ आरक्षण अधिक अदलाबदलीने झालेले विद्यार्थी यांची संख्या धरून ५२% पेक्षा अधिक असणार नाही.

S. C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

शैक्षणिक वर्ष १९९५-९६ सुरू असल्यामुळे "विशेष मागास प्रवर्ग" या प्रवर्गाच्या जातीमधून ... प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत ३१ ऑक्टो. १९९५ पर्यंत शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी-१४९४/प्र. क्र. २३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५ च्या आदेशान्वये ... जातीचे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याकडून घेऊन संबंधित महाविद्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील. वरील तारखेपर्यंत जर या प्रवर्गातील विद्यार्थी त्याच्या जातीचे प्रमाणपत्र शैक्षणिक संस्थाप्रमुखाला सादर करू शकले नाहीत तर, त्यांचा या राखीव जागेवर हक्क राहणार नाही. याचीही नोंद घेणे आवश्यक आहे.

७. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती करण्यात येते की, हे आदेश सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या व समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

वि. ब. शेन
उप सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट—"अ"

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी-१४९४/प्र. क्र. २३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्र दिनांक १५ जून, १९९५ अन्वये "विशेष मागास प्रवर्ग" अंतर्गत करण्यात आलेली जातीची यादी.

अ. क्र. जातीचे नाव

१. गोवारी, गवारी.

२. माना.

३. (१) कोष्टी, (२) हलबा कोष्टी, (३) हलबा जात, (४) साळी, (५) लाडकोष्टी, (६) गढेवाल कोष्टी, (७) देवकर, (८) सालेवार, (९) पद्मशाली, (१०) देवांग, (११) काषी बंध, (१२) पटवीस, (१३) सहसाले, (१४) साडे, (१५) जैनकोष्टी.

४. (१) कोळी, तत्सम जाती, (२) मच्छिमार कोळी, (३) अहीर कोळी, (४) खानदेशी कोळी, (५) पानकोळी, (६) ख्रिश्चन कोळी, (७) चुंबळे कोळी, (८) पानमरे कोळी, (९) सूर्यवंशी कोळी, (१०) मगिला कोळी, (११) सोनकोळी, (१२) वैती कोळी, (१३) खारवी, (१४) अनुसूचित जमातीमध्ये समावेश नसलेले कोळी.

५. (१) मुन्नेरवार, (२) मुन्नुरवार, (३) मुन्नुर, (४) तेलगु मुन्नुर, (५) मुन्नुरवार तेलगु, (६) मुन्नरकापू, (७) कापेवार, (८) तेलगु कापेवार, (९) मुन्नरवाड, (१०) तेलगु फुलमाळी, या जाती.

पुणे विद्यापीठ, पुणे ७

संदर्भ क्र. आरक्षण / ... / ९५ आरक्षण कक्ष

दिनांक : २२-७-९५.

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये,
सर्व मान्यताप्राप्त संस्था.

महोदय,

वरील शासन निर्णय आपणाकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/-
उपकुलसचिव,
आरक्षण कक्ष

पु.वि.मु. --५७०-८-९५ (१०६६)

S. S. C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाच्या
अभ्यासक्रमाखालील सर्व शैक्षणिक संस्थांमधून
मागास वर्गीयांकरिता राखून जागा ठेवण्याबाबत

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग

शासन शुद्धिपत्र क्रमांक - यूएसजी-१४९३/[२४२८]/विशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.

दिनांक ७ फेब्रुवारी, १९९६

वाचा :- (१) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. यूएसजी-१४९३/२४२८/विशि-४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्र दिनांक १२ जुलै, १९९४

(२) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक - सावीसी-१४९४/प्र. क्र. २३६/मावक-५, दि. १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दि. १५ जून १९९५

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र क्र ६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून १९९५

(४) शासन निर्णय, क्रमांक-यूएसजी-१४९३/[२४२८]/विशि-४, दिनांक २२ जून १९९५.

**शासन शुद्धिपत्रक :** शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक-यूएसजी-१४९३/[२४२८]/विशि-४, दि. २२ जून १९९५ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :

२ परिच्छेद-४ सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रमनिहाय असेल आणि ते मुक्त आणि मूल्याधारित जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असेल

तंत्रशिक्षण विभाग वगळता इतर शैक्षणिक विभागांतर्गत येणाऱ्या बिगरराखीव जागा या प्रथमतः भरण्यात याव्यात. यामध्ये गुणवत्तेनुसार असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचादेखील समावेश अराखीव उमेदवार म्हणून असेल. या विद्यार्थ्यांचा समावेश आरक्षणामध्ये करण्यात येऊ नये. यासाठी विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अराखीव म्हणून समजण्यासाठी पसंती कळविण्याचा प्रश्न उद्भवत नाही. उर्वरित जागा आरक्षणानुसार भरण्यात याव्यात, असे करताना शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण ५२% पेक्षा अधिक झाले तर त्यास कोणतीही हरकत नाही

परिच्छेद-५ मधील "मात्र बदलाबदलीने इतर प्रवर्गातून/पासून ५२% पेक्षा अधिक असणार नाही" हे शेवटचे वाक्य पूर्णत: वगळण्यात यावे

८ हे शुद्धिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सही/- अ. मा. भट्टलवार
अवरसचिव, महाराष्ट्र शासन

पुणे विद्यापीठ
पुणे-७

संदर्भ आरक्षण/४२/१२५

आरक्षण कक्ष
दि. : ४-३-९६

मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

महोदय,

सोबत शासन निर्णय आपणाकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे

कळावे

आपला विश्वासू,

सही/-
उपकुलसचिव (आरक्षण कक्ष)

पु.वि.मु. —५००—३—९६ (२८५४) [m-3]

S. C. College (Pune)

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभागातील
अधिकाऱ्यांना सर्व तंत्र शिक्षण संस्थामधून
विशेष मागास प्रवर्गांकरिता "राखीव जागा"
[illegible]

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग

शासन शुद्धिपत्रक क्रमांक बिशएस १३९५/११४०७/(३५/८०) तांशि १

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२

दिनांक २१ मार्च, १९९६

संदर्भ —(१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
क्रमांक : युएसजी १४९३/(२४२८) विशि–४
दिनांक २२ जून, १९९५

शासन शुद्धिपत्रक :—

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय/अनुदानित/विद्यापीठ व्यवस्थापित/विना अनुदानित संस्थांतील अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र/औषधनिर्माण शास्त्र या व्यवस्थापन शास्त्र इत्यादी व्यावसायिक विद्याशाखांच्या पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश करण्यासाठी मागासवर्गीयांकरिता आरक्षणाचे प्रमाण शासनाने यापूर्वीच खालीलप्रमाणे विहित केले आहे.

| | |
|---|---|
| (१) अनुसूचित जाती व अनुसूचित जातींतील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३ टक्के |
| (२) अनुसूचित जमाती | ७ टक्के |
| (३) विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३ टक्के |
| (४) भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती) | २.५ टक्के |
| (५) भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ३.५ टक्के |
| (६) भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २ टक्के |
| (७) इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९ टक्के |
| (८) विशेष मागासवर्गीय प्रवर्ग (एस.बी.सी) | २ टक्के |
| | एकूण : ५२ टक्के |

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४, ५ व ६ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :—

१ परिच्छेद क्र. ४ :—उपरोक्त आरक्षण प्रत्येक संस्थेत अभ्यासक्रमनिहाय असेल व ज्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश पद्धतीत मुक्त व मूल्यभारीत प्रकारच्या जागा असतात त्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रत्येक प्रकारास त्या त्या प्रमाणात लागू पडेल.

परिच्छेद क्र. ५ —संवर्गनिहाय आरक्षित जागा प्रथमतः भरण्यात याव्यात. एखाद्या मागासवर्गीय संवर्गातून उमेदवार उपलब्ध नसतील तर त्या संवर्गातील रिक्त जागा उर्वरीत संवर्गाच्या एकत्रित यादीतील गुणवत्तानुक्रमानुसार पूर्व नियोजित वेळी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा त्यांच्या विनंतीवरुन दुसऱ्या चांगल्या पसंतीच्या जागेवर प्रवेश बदल देण्यासाठी पुर्नविचार करण्यात यावा.

मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागांवर प्रवेश घेतलेले उमेदवार सर्वसाधारण गुणवत्तानुक्रमानुसार खुल्या जागांवरील प्रवेशासाठी देखील पात्र राहतील. खुल्या जागेवर प्रवेश देतांना पूर्वीची संस्था अभ्यासक्रम संगत अबाधित राहत असेल तर सर्व सवलतींसह अशा प्रवेशांची समरसरपालट करण्यात येऊन अशा उमेदवारांना खुल्या जागांवर प्रवेश मिळाला आहे असे समजण्यात यावे. त्यासाठी उमेदवाराने उपस्थित राहण्याची किंवा पसंती/इच्छा कळविण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही. परंतु राखीव जागेवर प्रवेश झाला त्यावाणी स्वतःचे पसंतीनुसार उपलब्ध नसलेल्या जागेवर खुल्या संवर्गातून प्रवेश मिळण्यासाठी [illegible] पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार आपल्या सर्वसामान्य गुणवत्तानुक्रमानुसार उपस्थित राहणे आवश्यक राहील. अन्यथा अशा प्रवेश पालटासाठी त्यांचा पुनर्विचार करता येणार नाही.

परिच्छेद क्र. ६ :—मागासवर्गीय उमेदवारांचे सर्वसाधारण गुणवत्तानुक्रमानुसार खुल्या जागांसाठी प्रवेश करतांना संस्थेत/अभ्यासक्रमात मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण शासन निर्धारित प्रमाणापेक्षा अधिक झाले तर त्यास कोणतीही हरकत राहणार नाही.

२. हे शुद्धिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(अ. ति. विहाडे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

पुणे विद्यापीठ, पुणे ७

सदर्भ क्र. आरक्षण / ४२ / ३७०

आरक्षण कक्ष
दिनांक : ८–७–९६.

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये,/ मान्यताप्राप्त संस्था

महोदय,

वरील शासन निर्णय आपणाकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/–
उपकुलसचिव,
आरक्षण कक्ष

पु. वि. मु.—४००–७–९६ (६१७)

S. S. C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

संवैधानिक आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त
होऊ न देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग.
शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक : ११ जुलै, १९९७.

संदर्भ:- १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.युएसजी १४९३/२४२८/विशि-४. दि.२३ जुन.१९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दि. जुलै,१९९४.

२) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र.सीबीसी १४९४/प्र.क्र.१३६/मावक-५, दि.१३ जून,१९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दि.१५ जून,१९९५.

३) शासन निर्णय क्र.सामान्य-प्रशासन-विभाग क्र.बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि.१५ जुन, १९९५ व शुध्दिपत्रक दि.२१ मार्च,१९९६.

४) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.युएसजी १४९३/२४२८/विशि-४, दि.२२ जुन, १९९५.

५) अतिरिक्त सरकारी वकील, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.एजीपीएल/[illegible]/एसएसजी. दि.१०.७.१९९७

प्रस्तावना:-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९३/१६७/सीआर-१४१/४१/९३/१६-ब. दि. [illegible] मार्च, [illegible] अन्वये विविध मागास प्रवर्गासाठी एकूण ५० टक्के आरक्षण विहित करण्यात आले होते. नंतर सामाजिकदृष्टया व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या काही जातींच्या विकासासाठी काही सवलती व उपाययोजना करणे आवश्यक असल्यामुळे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि.८ डिसेंबर, १९९४ चे परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या जातींसाठी एक स्वतंत्र 'विशेष मागास प्रवर्ग' असे संबोधण्यात येऊन त्यांच्यासाठी २ (दोन) टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते. तसेच या प्रवर्गासाठी क्रिमिलीयरचे तत्व लागु नाही हेही स्पष्ट करण्यात आले होते.

दि. ८ डिसेंबर, १९९४ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन आदेशास अनुसरुन उच्च व तंत्रशिक्षण विभागाने 'विशेष मागास प्रवर्गासाठी' २ टक्के आरक्षण ठेवून शासन निर्णय क्र.युएसजी १४९३/ (२४२८)/विशि-४. दि.२२ जून. १९९५ अन्वये विविध आरक्षणाबाबत आदेश निर्गमित केले आहेत. सदर निर्णयाप्रमाणे विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली असून एकूण आरक्षण ५२ टक्के विहित केले आहे.

S. S. C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

'भारतीय संविधान अनुच्छेद १४ तसेच १६ अन्वये सर्व प्रवर्गातील घटकांना समानता व समान संधी मिळावी' म्हणून मा. सर्वोच्च न्यायालयाने १९९३ साली मागासवर्गीय प्रवर्गांसाठी आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त असू नये असा निवाडा दिला आहे.

रिट याचिका क्र. २९८९/१९९७, श्री. पांडुरंग एस. पचाले विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर. या प्रकरणी सुनावणी सुरु असताना मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या १९९७-९८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश नियमावलीत संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतूद मा. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सॉहनी विरुध्द केंद्र या प्रकरणी १९९३ साली दिलेल्या निवाड्यानुसार नसल्यामुळे कायदेशीर नसल्याचे शासनाचे निदर्शनास आणून दिले आहे. (संदर्भ: १९९३-मा. सर्वोच्च न्यायालय ए.आर.-पृ.क्र.४७७, शीर्ष टिप्पणी (डब्ल्यू) प्रवेश नियमावलीतील राज्य शासनाने संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतूद ही मा. सर्वोच्च न्यायालयाचा अवमान ठरु शकते असेही मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यावर संवैधानिक आरक्षणाचे प्रमाण ५२ टक्क्यावरून ५० टक्के करण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात येतील असे शासनातर्फे प्रतिपादन केल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने समाधान व्यक्त केले असून उपरोक्त संदर्भात शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## शासन निर्णयः-

शासन आता या शासन निर्णयाद्वारे असे आदेश देत आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी या विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. युएसजी १४९३/(२४२८)/विशि-४, दि.२२ जून १९९८ अन्वये [illegible] प्रवर्गाकरिता राखून ठेवण्यात आलेल्या २ टक्के जागांचे आरक्षणाबाबत पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. हे आदेश १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत असून तात्काळ अंमलात येतील व उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक संस्थांतील सर्व विद्या शाखांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागू राहतील.

१. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या. त्यामुळे यापुढील विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती, त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात यावी.

२. भारतीय संविधानानुसार मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.टीइएम १०९४/(६३०३)/तांशि-१, दि.३ जून, १९९४ मधील परिच्छेद क्र.४ मध्ये विहित केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात याव्यात. सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय राहील. मुक्त (मेरीट सीटस्) तसेच मूल्याधारित (पेमेंट सीटस्) जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असावे

S. C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

३. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया झाल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागांवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

४. रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करून भरण्यात याव्यात.

३. शासन यापुढे असेही आदेश देत आहे की, १९९७-९८ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असेल व दि.९.७.१९९७ रोजी किंवा तत्पूर्वी या विभागाच्या दि.२२ जून, १९९५ च्या शासन निर्णयानुसार प्रवेश देण्यात आले असतील तर त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी:-

१. विशेष मागासवर्ग प्रवर्गांतर्गत करण्यात आलेल्या प्रवेशास बाधा न आणता पुढील प्रवेश प्रक्रियेत काही कारणास्तव होणाऱ्या रिक्त जागांवर ५० टक्के आरक्षित जागा जुळवून घ्याव्यात.

२. संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ऑ. शि. विहाडे )
शासनाचे सहसचिव

पुणे विद्यापीठ, गणेशखिंड
पुणे - ४११ ००७.

आरक्षण कक्ष
दि २२.७.९७

संदर्भ :- आरक्षण/९७/१८७३

प्रति

१. मा.प्राचार्य/संस्था प्रमुख, सर्व महाविद्यालये, सर्व मान्यताप्राप्त संस्था
२. मा.विभाग प्रमुख,सर्व शैक्षणिक विभाग,पुणे विद्यापीठ, पुणे - ७.
३. मा.उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश, पुणे विद्यापीठ, पुणे - ७.

महोदय,

वरील शासन निर्णय आपणाकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे. त्याची तातडीने अंमलबजावणी करावी ही विनंती

आपला विश्वासू,
सही/-
कुलसचिवांकरिता

S. C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना
संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील पदवी
अभ्यासक्रमाकरिता महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ठेवण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. जीईसी-1000/(123/2000)/तांशि-1
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - 400032.
दिनांक : 17 एप्रिल, 2000

प्रस्तावना :

भारताच्या संविधानात स्त्री-पुरुष भेद न ठेवता समानतेचे तत्व हा नागरिकांचा मूलभूत हक्क मानण्यात आला आहे. तसेच महिलांच्या बाबतीतही घटनेत सकारात्मक धोरण स्विकारण्यात आले आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी विविध शिक्षण अभ्यासक्रमाकरिता स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यादृष्टीने खरा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिलांचे बलशालीकरण आणि समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग करुन सर्वांगीण मानवी विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे जाणिवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेवून शासन निर्णय दि. 22/6/1994 अन्वये शासनाने महिलांना शासकीय नोकरीमध्ये 30 टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. यामागील खरा हेतू साध्य होण्याकरिता आता महिलांना पदवी अभ्यासक्रमाकरिता 30 टक्के आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाचा विचार होता.

शासन निर्णय :

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेवून शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण विनाराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गासाठी लागू राहील. जर विनाराखीव जागा [illegible]

तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गाकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण (Horizontal) राहील. उदाहरणार्थ जसे की, सध्या संविधानातील तरतुदीनुसार शासनाने अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता 13 टक्के जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील 30 टक्के आरक्षण हे अनुसूचित जाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिताच ठेवण्यात येईल व जर या प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरुष संवर्गातून भरण्यात येतील. म्हणजेच जर प्रवेशाकरिता एखाद्या विद्याशाखेसाठी प्रथम वर्षासाठी 100 जागा असतील तर त्यापैकी 13 जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता सध्या असलेले आरक्षण विचारात घेवून त्यापैकी 30 टक्के म्हणजेच 4 जागा ह्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिता आरक्षित राहतील.

S.S.C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

वर उल्लेखिलेल्या पद्धतीनेच इतर सर्व प्रवर्गांकरिताही सध्या असलेल्या आरक्षणांतर्गत महिलांना 30 टक्के समांतरपणे आरक्षण ठेवण्यात येईल. तसेच ज्या पदवी अभ्यासक्रमांकरिता मूल्यभारीत व मुक्त जागांवर देण्यात येतात ह्या प्रवेशांतर्गत देखील 30 टक्के आरक्षण महिलांकरिता देण्यात येईल.

सध्या सर्व तंत्र निकेतनांमध्ये पदविका अभ्यासक्रमासाठी महिलांकरिता शासन निर्णय क्र. टव्ल्युवीपी-1095/(2719)/व्यशि-5, दि. 17/1/1996 अन्वये ठेवलेल्या 25 टक्के आरक्षणात वाढ करून आता ते 30 टक्के इतके करण्यात येत आहे.

सदरच्या आरक्षित जागांवर जर महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर या रिक्त जागा त्याच शैक्षणिक वर्षात पुरूष संवर्गातून भरण्यात येतील व या रिक्त जागांचा त्या पुढील शैक्षणिक वर्षात अनुशेष धरला जाणार नाही.

वैद्यकीय शिक्षण विभाग आणि कृषि व पदुम विभागांतर्गत येणा-या सर्व पदवी अभ्यासक्रमांकरिता आदेश संबंधित विभागांकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदरचे आरक्षणविषयक आदेश शैक्षणिक वर्ष सन 2000-2001 पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही

(प्र. ह. क्षीरसागर)
शासनाचे सहसचिव

---

पुणे विद्यापीठ

संदर्भ क्र. आरक्षण/42/239

दिनांक : 17/5/2000

1) मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

2) मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय आपणांकडे माहितीसाठी आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवित आहे.

आपला विश्वासू

उपकुलसचिव,
आरक्षण कक्ष

Res 1

S. S. C. College Junnar (Pune)

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

(437)

Ph. [illegible] Unit
Inward No. 5209
Date 20/8/2001

महाराष्ट्र शासन

क्रमांक जीईसी १०००/(१२३/२०००)तांशि.१
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक :- ८ ऑगस्ट. २००१

प्रति,
सहाय्यक कुलसचिव (शै.प्रवेश)
पुणे विद्यापीठ,
पुणे

विषय:- महिला आरक्षणसंबंधी..

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपण आपले क्रमांक शैक्षणिक प्रवेश २८०७, दिनांक २.७.२००१ चे पत्र कृपया पहावे.

महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नीत असलेल्या महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासन [illegible] जीईसी १०००/(१२३/२०००)तांशि.१, दिनांक १७ एप्रिल, २००० अन्वये आदेश देण्यात आलेले आहेत. सदर आदेश फक्त पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांकरिता लागू आहेत.

आपला विश्वासु,
(श्या.र. चौरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

[illegible]
८/८/२००१

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

S. C. College (Pune) Junnar

( 1 3 )

F.NO 4-1/2001 U-5
Government of India
Ministry of Human Resource Development
(Deptt. of Secondary & Higher Education)

To, New Delhi the 13th, December, 2002

The Secretary,
University Grants Commission,
Bahadur Shah Zafar Marg,
NEW DELHI 110001.

Sub : Reservation of seats for persons with Disabilities in admission.

Sir,

I am directed to enclose herewith a copy of the letter received from the office of the Chief Commissioner for Disabilities Ministry of Social Justice & Empowerment dated 12/11/2002 alongwith Supreme Court order dated 11/9/2002 and 18/9/2002. Necessary instructions to all the concerned organizations institutions may please be issued for compliance of the directions of the Hon'ble Supreme Court under intimation to this Department as well as office of the Chief Commissioner for Disabilities Ministry of Social Justice & Empowerment.

Yours faithfully,

(S. R. DOGRA)
Under Secretary

---

Office of the Chief Commissioner for Disabilities
Ministry of Social Justice & Empowerment
Government of India

F.No. DL/A/CCD/2002/ 12/11/2002

To,
Secretary
Ministry of HRD
Shastri Bhawan, New Delhi.

Sub : Reservation of seats for persons with Disabilities in admission.

Sir,

I am directed to say that some of the Hon'ble High Courts had given the ruling that Sec. 39 of Persons with Disabilities (Equal Opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995 (PWD Act) which reads "All Government Educational Institutions and other educational institutions receiving aid from the Government, shall reserve not less than three percent seats for persons with disabilities", is applicable No. reservation of jobs. Some parties, such as All Kerala Parents Association, Department of Health, Kumari Rekha appealed against the orders of the concerned Courts. The Hon'ble Supreme Court vide their order dated 11/9/2002 in Civil Appeal No. 6120/2001 and 18/9/2002 in Civil Appeals No. 4604 of 2000 and 7892/2001 have held that Section 39 of Persons with Disabilities, Act deals with reservation of seats for persons with disabilities in Govt. Educational Institutions as well as educational institutions receiving aid from the Govt. and necessarily, therefore, the provision thereof must be complied with. Photo copies of the orders are enclosed.

It is requested that necessary instructions to all the concerned organizations, educational institutios including technical, medical, etc. may please be issued for compliance of the directions of the Hon'ble Supreme Court. The concerned authorities may also be requested that the provision of reservation of seats in admission is indicated in their prospectus/admission bulletin, etc. A copy of the interactions issued may please be sent to this office.

Yours faithfully,

(Thakur Datt Dhariyal)
Dy. Chief Commissioner, Disabilities.

S. S. C. College (Pune) Junnar

Offg. Principal
Shri Shiv Chhatrapati College
Junnar (Pune)

Scanned by CamScanner

F.NO 4-1/2001 U-5
Government of India
Ministry of Human Resource Development
(Deptt. of Secondary & Higher Education)

New Delhi the 13th, December, 2002

To
The Secretary,
University Grants Commission,
Bahadur Shah Zafar Marg,
NEW DELHI 110001.

Sub : Reservation of seats for persons with Disabilities in admission.

Sir,

I am directed to enclose herewith a copy of the letter received from the office of the Chief Commissioner for Disabilities Ministry of Social Justice & Empowerment dated 12/11/2002 alongwith Supreme Court order dated 11/9/2002 and 18/9/2002. Necessary instructions to all the concerned organizations institutions may please be issued for compliance of the directions of the Hon'ble Supreme Court under intimation to this Department as well as office of the Chief Commissioner for Disabilities Ministry of Social Justice & Empowerment.

Yours faithfully,

(S. R. DOGRA)
Under Secretary

---

Office of the Chief Commissioner for Disabilities
Ministry of Social Justice & Empowerment
Government of India

F.No. DL/A/CCD/2002/

12/11/2002

To,
Secretary
Ministry of HRD
Shastri Bhawan, New Delhi.

Sub : Reservation of seats for persons with Disabilities in admission.

Sir,

I am directed to say that some of the Hon'ble High Courts had given the ruling that Sec. 39 of Persons with Disabilities (Equal Opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995 (PWD Act) which reads "**All Government Educational Institutions and other educational institutions receiving aid from the Government, shall reserve not less than three percent seats for persons with disabilities**", is applicable No. reservation of jobs. Some parties, such as All Kerala Parents Association, Department of Health, Kumari Rekha appealed against the orders of the concerned Courts. The Hon'ble Supreme Court vide their order dated 11/9/2002 in Civil Appeal No. 6120/2001 and 18/9/2002 in Civil Appeals No. 4604 of 2000 and 7892/2001 have held that Section 39 of Persons with Disabilities, Act deals with reservation of seats for persons with disabilities in Govt. Educational Institutions as well as educational institutions receiving aid from the Govt. and necessarily, therefore, the provision thereof must be complied with. Photo copies of the orders are enclosed.

It is requested that necessary instructions to all the concerned organizations, educational institutions including technical, medical, etc. may please be issued for compliance of the directions of the Hon'ble Supreme Court. The concerned authorities may also be requested that the provision of reservation of seats in admission is indicated in their prospectus/admission bulletin, etc. A copy of the interactions issued may please be sent to this office.

Yours faithfully,

(Thakur Datt Dhariyal)
Dy. Chief Commissioner, Disabilities.

S. C. College (Pune) Junnar

Offg. Principal
Shri Shiv Chhatrapati College
Junnar (Pune)

Scanned by CamScanner

University Grants Commission
Bahadurshah Zafar Marg,
New Delhi 110002

No. F 6-1/2002 (CCP-II)

August, 2003

To,
The Registrar
University of Pune
Pune 411007
Maharashtra

Sub : Ensuring 3% reservation for persons with disabilities in Teaching & Non-Teaching Posts
Implementation of Hon'ble Supreme Court order dated 1809-2003.

Sir / Madam,

Kindly find enclosed a copy of the letter No. F 4-1/2001.U-5 dated 13-12-2002 alongwith its enclosures on the above subject, which is self explanatory and to request you to intimate the action taken in the matter by 10th Oct. 2003.

The contents of this letter may be brought to the notice of all the college affiliated to your universities.

Yours faithfully

(Urmil Gulati)
Under Secretary

---

University of Pune
Reservation Cell
Ref. : Reservation/42/732
Date : 25/11/03

To,
The Director / Principal
All Recognised Institutes / Affiliated Colleges,

Sir,

Please find enclosed herewith a copy of Letter No. F. No. 4-1/2001 U-5, dated 13/12/2002 of Government of India for your information and further necessary action.

Thanking you,

Your's faithfully

Sd/-xxx

For Registrar

UGC/11-12

S.S.C. College (Pune) Junner

Offg. Principal
Shri Shiv Chhatrapati College
Junner (Pune)

Scanned by CamScanner

आवक क्रमांक ...२५२०५...
दिनांक ...८/६/२००६...
१८२६

उन्नत व प्रगत गटाचे तत्व (क्रिमी लेअर), अनुसूचित जाती व्यतिरिक्त, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गांना लागू करतांना प्रमाणपत्राच्या नमुन्यातील बदल.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी १० /२००६/ प्र.क्र.१५/ मावक ५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक : ५ जून, २००६

वाचा :- १) शा.नि. सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च, १९९४
२) शा.नि. स.क., सां.का. व क्री. विभाग क्र.सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/मावक-५, दिनांक १६ जून, १९९४
३) शा.नि. सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५
४) शा.नि. स.क., सां.का. व क्री.विभाग क्र.सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/मावक-५, दिनांक ५ जून, १९९७
५) शा.नि. सा.न्या.,सां.का., क्री. व वि.स.विभाग क्र.सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१२०/ मावक-५. दिनांक १ नोव्हेंबर, २००१
६) शा.नि. सा.न्या., सां.का. व वि.स.विभाग क्र.सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.११९/मावक-५, दिनांक २९ मे, २००३

प्रस्तावना :- सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २३ मार्च, १९९४ च्या शासन निर्णयानुसार केवळ भटक्या जमाती (क) भटक्या जमाती (ड) आणि इतर मागासवर्गांना उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व लागू केलेले आहे. आता महाराष्ट्र राज्य लोकसेवा - अनुसूचित जाती, जमाती व विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम - २००१ मधील कलम चार पोट कलम २(दोन) च्या परंतुका अन्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त निरधिसूचीत जाती (अ) (विमुक्त जाती - अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) त्याचबरोबर इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गांना लागू करण्याची तरतूद केली आहे. सदर तरतूद विचारात घेऊन उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व लागू करण्यासंबंधी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक :- आरक्षण अधिनियम २००१ हा अधिनियम अंमलात आणल्याच्या दिनांक २९ जानेवारी, २००४ पासून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त निरधिसूचीत जाती

S. C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

(विमुक्त जाती - अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व लागू करण्यात येत आहे.

२. पदोन्नती वगळता ज्या ज्या प्रयोजनाकरिता आरक्षणाचे आदेश लागू करण्यात आलेले आहेत, त्या त्या सर्व प्रयोजनाकरिता क्रिमीलेअरचे तत्व लागु राहील व त्याप्रमाणे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. उन्नत व प्रगत गटाच्या (क्रिमीलेअरच्या) मार्गदर्शक तत्वासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने व विहित उत्पन्न मर्यादेसंदर्भात या विभागाने वेळोवेळी काढलेले आदेश विचारात घेण्यात यावेत.

४. संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १६ जुन, १९९४ मधील मुद्दा क्रमांक ४ खाली, " आदेश भटक्या जमाती (क) धनगर व तत्सम जाती, भटक्या जमाती (ड) वंजारी व तत्सम जाती आणि इतर मागासवर्ग यांना लागु राहतील" हा परिच्छेद वगळण्यात येत आहे.

५. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती सोडून विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाच्या तत्वानुसार प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट "अ" प्रमाणे राहील.

हे शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे. तरी सर्व संबंधित प्राधिकाऱ्यांनी वरील सूचना तातडीने अमलात आणाव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०६०५१५३०३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(बलदेव चंद)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा / अपील शाखा, मुंबई (पत्राने)
संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

S. C. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

महाराष्ट्र राज्याबाहेरील अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय सवलतीस पात्र नसल्याबाबत ..

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन परिपत्रक क्र.सीबीसी-1290/23116/प्र.क्र.378/मावक-5,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-400 032, दिनांक: 24 ऑगस्ट, 1995.

वाचा:-
1) गृह मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली, यांचे पत्र क्र.बीसी-12025/2/76/एससीटी-1, दिनांक 22 मार्च 1977
2) गृह मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली, यांचे पत्र क्र.बीसी-16014/1/82/एससी ॲन्ड बीसीडी-1, दिनांक 18-11-1982.
3) गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.बीसी-16014/1/82/एससी ॲन्ड बीसीडी-1, दिनांक 6 ऑगस्ट, 1984.
4) गृह मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे पत्र क्र.बीसी-16014/1/82/एससी ॲन्ड बीसीडी-1, दिनांक 22 फेब्रुवारी, 1985.
5) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.सीबीसी-1084/54577/1813/बीसीडब्ल्यू-5, दिनांक 1 नोव्हेंबर 1985.

परिपत्रक:- ॲक्शन कमिटी ऑन इश्यू ऑफ कास्ट, सर्टिफिकेट टू शेड्यूल कास्ट्स ॲन्ड शेड्यूल ट्राईब्स इन द स्टेट ऑफ महाराष्ट्र व इतर यांनी सर्वोच्च न्यायालयात भारत सरकार विरुध्द रिट पिटीशन (सी) क्रमांक 893/90 दाखल केले. त्या याचिकेत "ए" राज्याशी संबंधित असलेली अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची व्यक्ती "बी" राज्यात स्थलांतरीत झाल्यावर त्या राज्यात सारखीच नामसादृश्य जात/जमात राज्य घटनेच्या हेतूसाठी "बी" त्या राज्याशी संबंधित अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती म्हणून निर्देशित केली गेली असल्यास स्थलांतरीत राज्यात अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीकरिता असलेले लाभ/सवलतीकरीता पात्र समजले जाईल काय हा प्रश्न याचिकेत उपस्थित केला होता. त्या याचिकेवर दिनांक 18-7-94 रोजी सर्वोच्च न्यायालयात घटनापिठाने जो निर्णय दिला आहे, त्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे शासनाकडून निर्देश देण्यात येत आहेत.

(1) ज्या अनुसूचित जाती/सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील व्यक्ती (इतर मागासवर्ग) महाराष्ट्राबाहेरील राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरीत झाल्यास त्यांच्या मूळच्या राज्यात त्यांना जो अनुसूचित जाती/सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्याचा दर्जा (इतर मागासवर्ग) त्यांना प्राप्त झालेला आहे. त्या दर्जाच्या आधारे फक्त मूळच्या राज्यात त्यांना अनुसूचित जाती/सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाकरीता देय असलेले फायदे/सवलती प्राप्त होतील. महाराष्ट्र राज्यात त्यांना कोणत्याही सवलती/फायदे प्राप्त होणार नाहीत.

(2) एका राज्यातून दुस-या राज्यात नोकरी शिक्षण वगैरे करिता स्थलांतरीत होणा-या अनुसूचित जातीच्या व्यक्तींना ते ज्या राज्यात स्थलांतरीत झाले असतील, त्या राज्यात जातीची प्रमाणपत्रे मिळत नाहीत. स्थलांतरीतांची ही अडचण दूर करण्याकरीता केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक 22-3-77 च्या पत्र क्रमांक बीसी-12025/2/76/एससीटी-1, मधील सूचनांत अंशत: बदल करुन दिनांक 18-11-82, 6-8-84 आणि दिनांक 22-2-85 च्या वर नमूद केलेल्या पत्रान्वये एका राज्यातून दुस-या राज्यात स्थलांतरीत आलेल्यांना, त्यांच्या वडिलांना त्यांच्या मूळ राज्यातील सक्षम अधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारावर ज्या प्रकरणात मूळ राज्यामार्फत चौकशी करणे आवश्यक आहे, अशी प्रकरणे वगळता जातीची प्रमाणपत्रे द्यावीत, अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत. स्थलांतरीतांना जातीचे प्रमाणपत्र घेण्यासाठी त्यांना त्यांच्या मूळ राज्यात जावे लागू नये व ते ज्या राज्यात स्थलांतरीत झाले असतील त्या राज्यात त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळावे या उद्देशाने ही सवलत दिलेली आहे. या प्रमाणपत्राच्या आधारावर त्यांना त्यांच्या मूळ राज्यात जो दर्जा प्राप्त झालेला आहे व त्या जाती/वर्गासाठी ज्या सवलती देय होतात त्या सवलतीचा लाभ घेता येईल. तसेच केंद्र सरकारतर्फे देण्यात येणा-या सवलती देखील त्यांना देय ठरतील. परंतु महाराष्ट्र राज्यात जे स्थलांतरीत झाले असतील त्यांना राज्यातील सवलती प्राप्त होणार नाहीत असे पुन: एकदा स्पष्ट करण्यात येत आहे.

(3) महाराष्ट्र राज्यात व अन्य राज्यात ज्या समान जाती आढळून येतात अशा जातीपैकी एखाद्या समान असलेल्या जातीचे



कृ.मा.प.

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

College (Pune) Junnar

Scanned by CamScanner

प्रमाणपत्र महाराष्ट्राबाहेरील राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले असल्यास त्या प्रमाणपत्र धारकास त्या राज्यातील सवलतीचे फायदे प्राप्त होणार नाहीत.

सर्व शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील शासकीय व निमशासकीय कार्यालयांकरीता स्वतंत्ररित्या परिपत्रकाद्वारे वरील तरतुदी निदर्शनास आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मं. बं. कांबळे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2, मुंबई/नागपूर,
सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य महानगर दंडाधिकारी,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
आयुक्त आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सहसंचालक (जाप्रत), समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर आदेश त्यांचे अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांचे निदर्शनास आणून द्यावेत,
सर्व कार्यासने, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
निवड नस्ती, का. मावक-5.

---

* पत्राद्वारे.

S. S. College (Pune) Junnar

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner